# श्री. देवराव विठोबाजी कोकाटे

सेवक क्र. ७५

मु. नयापुरा, प्रेमनगर, नागपूर

माझ्या वडील भावाची मुलगी शशिकला ही अकरा वर्षाची असताना अचानक तिला भूतबाधा झाली. त्यामुळे ती अतिशय आजारी झाली. डॉक्टर, वैद्य यांनी पुष्कळ उपचार केले पण आराम झाला नाही. आमच्या शेजारी बाजीराव माटे राहतात. ते वैद्य आहेत. याची आम्हाला माहिती होती. रात्री दोनच्या सुमारास आम्ही बाजीराव माटे यांच्याकडे गेलो. त्यांना मुलीची तब्येत बिघडली असून आपण तिला तपासण्याकरिता चला अशी विनंती केली. त्यावेळी ते भजन करीत होते. त्यांनी घरातुन पाणी आणले व बाबा हनुमानजींच्या नावाने तीर्थ करुन दिले. ते मुलीला पाजायला सांगून सकाळी प्रकृतीबद्दल माहिती कळवायला सांगितले. तीर्थ पाजल्यावर मुलीला आराम झाला. दुसऱ्या दिवशी सकाळभ मी बाजीरावजी माटे यांच्याकडे जाऊन त्यांना मुलीला आराम झाल्याचे सांगितले. त्यानंतर मी म्हणालो, एका पाण्यामध्ये(तीर्थामध्ये) एवढी शक्ती आहे तर बाबांमध्ये किती शक्ती असली पाहिजे. मला बाबांचे दर्शन घडवून द्या. आम्ही बाजीराव यांच्यासोबत बाबांकडे गेलो. बाबा आपल्यासारचीच व्यक्ती दिसत असले तरी त्यांच्यात दैवी शक्ती खूप आहे असे बाजीराव म्हणाले. तुम्ही या तत्त्वार आले तर तुमच्यातही ती शक्ती येऊ शकते. नंतर आम्ही या तत्त्वाचा स्वीकार केला. मला जुवा खेळण्याचा छंद होता. पण या तत्त्वाचा स्विकार केल्यानंतर माझी व्यसन सुटत गेली. या तत्त्वाचा स्वीकार केल्यानंतर एकदा मी जुव्यात ५००/- रु. हरलो. या मार्गाचा स्वीकार केल्यानंतर सर्व व्यसने सोडावी लागतात. आपण जर जुवा खेळलो तर आपल्याला तत्त्वावरुन काढतात की काय अशी भिती वाटत होती. त्याच रात्री मला एक स्वप्न पडले. एका नदी किनारी बाभळीचे झाड आहे. त्या झाडाखाली महानत्यागी बाबा जुमदेवजी स्वतः बसले आहेत. जवळपास पंधरा ते वीस सेवक बसले आहे. मी बाबांच्या दर्शनाला निघालो. दुरुनच बाबांनी म्हटले, देवरावजी तिथेच थांबा, पुढे येऊ नका. दुसऱ्या दिवशी सकाळी ही गोष्ट बाजीरावजी माटे यांना सांगितली. त्यांच्यासोबत बाबांकडे जाऊन मला पडलेले स्वप्न बाबांना सांगितले आणि जुळा खेळलो यांची क्षमा मागितली. जीवनात वाईट व्यसनांपासून दूर राहण्याचा निश्चय केला.

फंड अनुदान अडीचशे रुपये चार वर्षात जमा करावयाचे आहे. मी एकचवेळी एकशे एक रु. फंड अनुदानात दिले आणि मला धंद्यात यश मिळाले. माझ्या मते बाबांचे शब्द म्हणजे एक महान शक्ती आहे. ती फंड अनुदानामध्ये आहे. बाबंच्या आदेशाप्रमाणे जसजसे फंड अनुदानात पैसे जमा करीत गेलो तसतसा मला धंद्यात योग मिळत गेला.

माझे लग्न झाल्याला बरीच वर्षे होऊनही मला पुत्रसंतती झाली नाही म्हणून मला फार दुःख वाटत होते. एक दिवस बाबांकडे जाऊन बाबांना विनंती केली की, बाबा पुत्रसंसती नाही. दुसरी पत्नी करण्याची इच्छा नाही. तेव्हा बाबांनी मोठ्या प्रेमान मार्गदर्शन केले व म्हणाले की, तुझ्या नशीबात मुलगा आहे. दुसरी पत्नी करु नको. तेव्हा बाबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रयत्नात राहिलो. परमेश्वराच्या कृपेने एका वर्षाच्या आत मला पुत्रप्राप्ती झाली व बाबांचे शब्द खरे ठरले. मला अनुभव आला. बाबा जे बोलतात तेच खरे होते. बाबा माण्या मते परमेश्वरच आहेत व त्यांचे नाव सुवर्ण अक्षरात लिहिले पाहिजे असे वाटते.

* * * * *